## नियमित दिवाणी मुकदमा क्र.२०३/२०२४ मधील नि. क्र.३६ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यात यापूर्वी नि.क्र.२५ वरील दुरुस्ती अर्जावर र. रु. १,०००/– खर्चाबाबत आदेश पारीत करणेत आलेला आहे. तथापि, सदरची दुरुस्ती नजर चुकीने करणेचे राहूल गेलेली आहे. करीता, नि.क्र.२५ वरील आदेशानुसार खर्च रक्कम रुपये १,०००/– भरुन घेणेत येवून दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, अशी वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून सदर अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादी असे कथन करतात की, वादींना खर्चाची रक्कम भरणेची संधी देवूनही वादींनी वेळेत खर्चाची रक्कम भरलेली नाही. वादी याने खर्चाची रक्कम का भरली नाही, याचा प्रस्तुत अर्जात वादी याने कोणताही खुलासा केलेला नाही. करीता, वादींचा अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे. यदा कदाचित अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादीस वादीकडून खर्चाची रक्कम देणेचा आदेश करणेत यावा, अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

०३. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुत अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींच्या दाव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्याचा पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. या न्यायालयाचे पूर्व पिठासन अधिकारी यांनी दिनांक २९.०१.२०२५ रोजी अर्ज नि.क्र.२५ र. रु. १,०००/– खर्च देणेचे अटीवर मंजूर केलेला आहे. तथापि, वादी यांनी सदरची दुरुस्ती अनावधानाने केली नसल्याचे त्यांचे कथन आहे. माझे मते, वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली मागणी मान्य केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तुत दाव्यात अदयाप दोन्ही पक्षांचा

पुरावा सुरु झालेला नाही. वादी यांना नि.क्र.२५ वरील आदेशानुसार दुरूस्ती करणेस परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. माझ्या मते, जर नि.क्र.२५ वरील दुरूस्ती अर्जावरील आदेशानुसार दुरुस्ती करणेस मंजूरी दिलेस दाव्याचे स्वरूपात फार मोठा बदल होईल, अशी बाब दिसून येत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र.३६ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी नि.क्र.२५ वरील आदेशानुसार तात्काळ दुरूस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.08.11 11:05:49 +0530

दि.०७.०८.२०२५ (एस. पी. सैय्यद)

वडूज. २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.